# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 27/04/2023 (गुरूवार) सायंकाळ


---

## घरफोडी करणाऱ्या आरोपीला अटक

## पोस्टे कोंढाळी यांची कारवाई

पोस्टे कोंढाळी येथील अप क्र. ४२/२०२३ कलम ४५४, ४५७, ३८०, ३७९ भांदवि मधील अज्ञात आरोपीचा शोध घेवुन आरोपी नामे– नागेश उर्फ योगेश सुभाष तायडे वय ३१ वर्ष, रा. वलगाव जि. अमरावती ह. मु. भवानी वार्ड वरूड यास अटक करून आरोपीकडुन गुन्हयातील संपूर्ण खालील मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

१) सोन्याचे गहु मणी १५ नग वजन ०७ ग्रॅम ४५० मिली

२) सोन्याचे पदक वजन ०६ ग्रॅम १०० मिली

३) सोन्याची अंगुठी वजन ०४ ग्रॅम ८३० मिली

४) चांदीच्या दोन तोरडया वजन ४० ग्रॅम १४० मिली

५) चोदीचे दोन जोडवे वजन १० ग्रॅम ५५० मिली

६) मोटार सायकल क्रमांक एम. एच–४० ए. व्ही ३७७८ किमती १०,०००/–रू. असा एकुण ५२,५००/–रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



## विनयभंग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. उमरेड** :– फिर्यादी/पिडीता वय ३५ वर्ष यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे अप. क्र. ७८/२०१९ कलम ३५४(अ), ३४ भादवि. सहकलम ८ पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

यातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी ही घरासमोरील शाळेच्या पटांगणात तिच्या सोबतच्या मुलींसोबत खेळत असतांना **आरोपी नामे– सतीश उर्फ सदाशिव सहारे, वय २४ वर्ष, रा. मंगळवारी पेठ उमरेड** + २ यांनी पिडीत मुलगी हिला संडास कुठे आहे या बहाण्याने हाथ पकडुन नेले. पिडीत मुलीच्या मैत्रिणीने फिर्यादीला जावुन सांगितले की, आरोपीतांनी पिडीत मुलगी हिला संडास कुठे आहे या बहाण्याने हाथ पकडुन संडास खोलीत घेवुन गेले व तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरण्याचे तपास सपोनि लोणे यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिंनाक २७/०४/२०२३ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश डी. जे. त्रिवेदी सा. नागपूर यांनी वरील नमुद आरोपीस कलम ३५४(अ) (१) भांदवि. मध्ये ०२ वर्ष सश्रम कारावास व १०००/–रू. दंड दंड न भरल्यास ०१ महिना साधी कैद अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी राऊत मॅडम यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन पोना/४८७ माधव काळे पोस्टे उमरेड यांनी मदत केली आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पो.स्टे. उमरेड:** – दिनांक २५/४/२०२३ चे १८/३० वा. चे सुमारास पो.स्टे. उमरेड हद्दीत फिर्यादीची अल्पवयीन बहिण वय ८ वर्ष ही स्वत:चे बैल जनावर रानात चारण्यास गेली असता बैल जोडी रानातुन न दिसुन आल्याने फिर्यादीने बैल शोधुन आणण्यास सांगितले असता नाबालीक ही उमरेड–भिवापुर रोडने कारगाव फाटा जवळ भिवापुर येथे नेले पोलीसांनी नाबालीकेचे विचारपुस करून राहते पत्त्यावर पोहचले असता नाबालीक ही नजर चुकवुन पळुन गेली पोलीस व नातलग सर्वानी रात्री व सकाळी पर्यत शोध घेतला नाबालीक ही घरी परत आली नसुन मिळुन आली नाही नाबालीकाचे अंगात आकाशी रंगाची टॉप हाफ बाहयाचा, काळी लॅगीन, पायात चप्पल नव्हती रंग सावळा ४ फुट उंची वर्णणाचे असुन नाबालीकेला कोणीतरी अज्ञात इसमाने फुस लावुन दिशाभुल करून पळवुन नेले असावे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि वाघ मो. क्र. ९९७५८१८४०१ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**